

# गुड मॉर्निंग

समिरा गुजर

# साहित्यगंगा

मराठी साहित्य टिकेल का? तरुणाई ते वाचेल का? मराठीचे काय होणार? गेली कित्येक वर्षे या विषयांवर राहून-राहून चर्चा होतेच आहे; पण 'बदल' अनेकदा पाय न वाजवता येतात, असे मला वाटते. साहित्य क्षेत्रात काही अनुकूल बदल घडत आहेत आणि ते समोर आल्यावर असे वाटले, हो कदाचित आपली साहित्यगंगा अशीच अव्याहत वाहत असताना, तिच्यात सचैल डुंबण्यासाठी आता 'तंत्रज्ञानाचा' घाट हवा. बुकगंगा नावाचा एक उपक्रम मंदार जोगळेकर-संजय पेठे अशा मराठी तरुणांनी येऊन सुरू केला आहे. आपल्या लॅपटॉपवर व आय पॉडवर अवघ्या एका बोटाच्या स्पर्शाने आता साहित्यनगरीचा खजिना खुला होऊ शकतो. आता पुस्तक म्हणजे केवळ 'पांढऱ्यावर काळं' मानायचे कारण नाही. ते जसे वाचता येऊ शकते, तसे पाहता येऊ शकते, ऐकू येऊ शकते. प्रत्यक्ष कवीच्या आवाजात कविता ऐकता येईल, कदाचित ज्या स्थळाविषयी वाचतोय, त्याची चित्रे वा व्हिडिओही पाहता येईल. दृक्‌श्राव्य माध्यमाचा सुरेख वापर करीत लहान मुलांशी साहित्याची आणि साहित्यिकांची मैत्री शक्य होईल; शिवाय ही पुस्तके तुम्हाला कमी किमतीत उपलब्ध होतात. कारण- ही ई-आवृत्ती असल्याने छपाईचा खर्च नाही; शिवाय सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे लेखकाच्या हक्कांचा आणि रॉयल्टीचा इथे पक्का विचार आहे. पुस्तकांची 'पायरसी' होऊ नये यासाठी खास काळजी घेण्यात आली आहे.

हे सारे साकारणारे उद्योजक मंदार जोगळेकर हे स्वतः मराठी माध्यमातून शिकलेले, 'कमवा आणि शिका' योजनेतून शिक्षण पूर्ण केलेले तुमच्या-माझ्यासारखे सर्वसामान्य, मध्यमवर्गीय कुटुंबातील आहेत; पण आज उद्योग 'उभा करून' ते यशस्वी मराठी उद्योजक ठरलेत. स्वप्नांना, कल्पनांना साकार करा. या युगात सगळ्यात मोठे भांडवल म्हणजे 'कल्पना'- 'आयडिया', असे म्हटले जाते. मला वाटते- त्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

ज्येष्ठ साहित्यिक व कवी प्रा. अशोक बागवे एकदा गमतीत मुलांना म्हणाले होते, की तंत्रज्ञान काय किमया करू शकते, हे ज्ञानेश्वरमाऊलींनी फार आधीच ओळखले होते. पाहा ना, त्यांनी लिहूनच ठेवले आहे- 'ई-ये मराठीचिये नगरी'. त्यांची ही बौद्धिक गंमत मला मनापासून आवडली होती.

माझ्या पिढीतल्या साहित्यप्रेमींना खरेच मनापासून असे वाटत होते, की माझे लेखक मला थेट भेटावेत. त्यांच्याशी चर्चा करता यावी. 'ऑर्कुट'वर अनिल अवचट भेटले, तेव्हा कोण आनंद झाला होता मला. नलेश पाटील माझे लाडके कविमित्र- त्यांच्याकडे माझा मोबाईल नंबर आहे. ते सगळ्यांना एसएमएसद्वारा कळवतात; त्यांच्या कविता कोणत्या दिवळी अंकात आल्या आहेत ते- मग मी धावत जाऊन ते अंक आणते. पण, एकंदर असे टेक्नो फ्रेंडली साहित्यिक इतके दिवस तरी हाताच्या बोटांवर मोजता येतील इतकेच होते; परंतु आता चित्र बदलेल. माझ्या लाडक्या साहित्यिकांचे ब्लॉग असतील, ज्यावर मी त्यांना प्रतिक्रिया कळवेन. त्यांचे उत्तर आले, की हरखून जाईन. 'फेसबुक'वर त्यांनी मला 'ॲड' केले, की खुश होईन, त्यांच्या आगामी पुस्तकांविषयी मला तेच सांगतील आणि मी ॲडव्हान्समध्येच 'ऑनलाईन' लाईनमध्ये उभी राहीन!

मला आठवते- मी एकदा डिरेक्टरीतून नंबर शोधून विंदा करंदीकरांना फोन केला होता. 'स्पर्शाची पालवी' हा त्यांचा लेख संग्रह आम्हाला अभ्यासाला होता. त्यातला एक उल्लेख होता फादर.

''आमच्या शिक्षकांनाही त्याचा खास उलगडा झाला नव्हता. मी भीत भीत फोन केला; पण विंदांनी इतक्या अगत्याने माहिती सांगितली, बाबा आमटेंसारखा कुष्ठरोगाच्या क्षेत्रात काम करणारा हा कर्मयोगी; काम करीत असताना दुर्दैवाने तोही कुष्ठरोगाने गेला. विंदांनी उल्लेख केला होता- दुःख असावे, तर त्याच्यासारखे - दुसऱ्याचे दुःख आपले मानणारे. विंदांशी बोलून फोन खाली ठेवताना मी किती अधिक समृद्ध झाले होते. त्यानंतर स्पर्शाच्या पालवीच्या पानापानातून 'विंदा'च माझ्याशी बोलू लागले.

लेखकाच्या एकांतांचा आदर राखून, वयोमानाचे भान राखून त्यांच्याशी संवाद साधण्याची माझी भूक कदाचित आता संगणक भागवू शकेल. अगणित आनंदाच्या अशा क्षणांसाठी मी आतुर आहे.

-smaira.gujar@yahoo.com